0 9 MAR 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महिलांच्या यशोगाथांमागील संघर्ष प्रेरणादायी : डॉ. शिर्के



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात विविध क्षेत्रांत प्रभावी योगदान देणाऱ्या महिलांचा कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कोल्हापूर, ता. ८ : विविध क्षेत्रांत यशस्वी असलेल्या महिलांच्या यशोगाथांमागे असलेला त्यांचा अनेक वर्षांचा संघर्ष समाजासाठी प्रेरणादायी आहे, असे मत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी आज येथे व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या श्रीमती शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन, बेटी बचाओ अभियान, विद्यार्थी विकास विभाग आणि संग्राम संस्था (सांगली) यांच्या संयुक्त ''महिला उद्योजकांची यशोगाथा आणि स्त्री सबलीकरणापुढील आव्हाने'' विषयावर एकदिवसीय परिसंवाद आणि महिला उद्योजकांचा सत्कार असा संयुक्त कार्यक्रम झाला. त्याच्या उद्‌घाटन प्रसंगी ते बोलत होते. राजर्षी शाहू सभागृहात कार्यक्रम झाला.

प्रभा कुलकर्णी, विजयमाला देसाई, सुचेता कोरगावकर, शैलजा सूर्यवंशी, साधना घाटगे, डॉ. रेश्मा पवार, अश्विनी दानीगोंड, डॉ. सपना आवाडे यांचा सत्कार झाला. डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. प्रतिभा देसाई, मीना शेषू प्रमुख उपस्थित होत्या.

पहिल्या सत्रात डॉ. राजश्री बारवेकर, डॉ. नीलांबरी जगताप व अमृता मांजरेकर यांनी संवाद साधला. त्यानंतर दुसऱ्या सत्रात 'स्त्री सबलीकरणापुढील आव्हाने' विषयावर खुली चर्चा झाली. डॉ. भारती पाटील, मीना शेषू व डॉ. मेघा पानसरे यांनी सहभाग घेतला. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले.

0 9 MAR 2022

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महिलांच्या यशोगाथांमागील संघर्ष प्रेरणादायी

## डी. टी. शिर्के : विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिलांचा शिवाजी विद्यापीठात गौरव

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** 'विविध क्षेत्रांत यशस्वी असलेल्या महिलांच्या यशोगाथांमागे असलेला त्यांचा अनेक वर्षांचा संघर्ष आणि कष्ट समाजासाठी प्रेरणादायी ठरणारे आहे,' असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी मंगळवारी केले.

विद्यापीठातील शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन, बेटी बचाओ अभियान, विद्यार्थी विकास विभाग आणि सांगलीच्या संपदा ग्रामीण महिला संस्था (संग्राम) यांच्यातर्फे जागतिक महिला दिनानिमित्त 'महिला उद्योजकांची यशोगाथा आणि स्त्री सबलीकरणापुढील आव्हाने' या विषयावरील परिसंवाद आणि महिला उद्योजकांचा सत्काराचा कार्यक्रम घेण्यात आला.



कोल्हापुरात मंगळवारी जागतिक महिला दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात विविध क्षेत्रांत प्रभावी योगदान देणाऱ्या महिलांचा कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी शेजारी डावीकडून अश्विनी दानीगोंड, रेश्मा पवार, विजयमाला देसाई, प्रभाताई कुलकर्णी, मीना शेषू, प्रतिभा देसाई, भारती पाटील, व्ही. एन. शिंदे, सुचेता कोरगावकर, शैलजा सूर्यवंशी, साधना घाटगे, सपना आवाडे, आर. व्ही. गुरव उपस्थित होते. (छाया : नसीर अत्तार)

विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात ते बोलत होते. विद्यापीठाच्या व्यासपीठावर शैक्षणिक, राजकीय, माहिती तंत्रज्ञान, आरोग्य, सामाजिक, आर्थिक आदी विविध क्षेत्रांत योगदान देणाऱ्या महिलांचा सत्कार होतो आहे, ही अतिशय महत्त्वाची बाब आहे.

त्यांचे यश हे काही एका दिवसात मिळालेले नाही. येथील प्रत्येक महिलेने त्यासाठी मोठा संघर्ष केलेला आहे. त्यांचा हा प्रवास प्रेरणादायी आहे. त्यांनी विद्यार्थी-विद्यार्थिनींमध्ये उद्योजकता विकास, कौशल्य विकास या दृष्टीने उपयुक्त अशा सूचना कराव्यात. जेणे करून त्याचा विद्यार्थीहितासाठी उपयोग करता येईल, असे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले.

या कार्यक्रमात प्रभाताई कुलकर्णी, विजयमाला देसाई, सुचेता कोरगावकर, शैलजा सूर्यवंशी, साधना घाटगे, डॉ. रेश्मा पवार, अश्विनी दानीगोंड, प्रा. डॉ. सपना आवाडे या विविध क्षेत्रांत चमकदार कामगिरी बजावणाऱ्या महिलांचा कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

शाल, सन्मानपत्र व स्मृतिचिन्ह असे सत्काराचे स्वरूप होते. यावेळी संपदा ग्रामीण महिला संस्थेच्या सचिव मीना शेषू, डॉ. प्रतिभा देसाई, आर. व्ही. गुरव आदी उपस्थित होते.

शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासनाच्या समन्वयक डॉ. भारती पाटील यांनी प्रास्ताविक केले. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. दरम्यान, उद्घाटनानंतर पहिल्या सत्रात उपस्थित सत्कारमूर्तींसमवेत डॉ. राजश्री बारवेकर, डॉ. नीलांबरी जगताप आणि अमृता मांजरेकर यांनी संवाद साधला. दुसऱ्या सत्रात 'स्त्री सबलीकरणापुढील आव्हाने' या विषयावर खुली चर्चा झाली. या चर्चेत डॉ. भारती पाटील, मीना शेषू, डॉ. मेघा पानसरे यांनी सहभाग घेतला.

### सबलीकरणासाठी व्यवस्थेला प्रश्न विचारा

समाजात स्त्रिया असुरक्षित आहेत. कारण, या समाजातील सर्व संस्था, व्यवस्था पुरुषांकडून निर्माण आणि नियंत्रित केल्या जातात. स्त्री सबलीकरण होण्यासाठी त्यांनी व्यवस्थेला 'का?' हा प्रश्न विचारला पाहिजे. स्त्रियांनी कुटुंबव्यवस्थेशी स्वतःच्या अधिकारांबाबत परस्परसंवाद करण्यास शिकायला हवे. वेळ पडल्यास संघर्षही केला पाहिजे, असे मीना शेषू यांनी 'स्त्री सबलीकरणापुढील आव्हाने' या विषयावरील परिसंवादात सांगितले. स्त्री सबलीकरण या संकल्पनेची पुनर्व्याख्या करण्याची गरज आहे. कारण, स्त्री निसर्गतः सबला असून, तिला पुरुषसत्ताक व्यवस्थेने अबला ठरवले आहे. तिला समान संधी मिळाल्यास ती स्वतःची ओळख निर्माण करु शकते, असे मत डॉ. भारती पाटील यांनी व्यक्त केले. देशाच्या नागरिक असलेल्या स्त्रियांना सामाजिक सुरक्षितता देण्याची जबाबदारी शासनाची आहे. शासन ते देत नसेल, तर स्त्रियांनी एकत्र येऊन आवाज उठवला पाहिजे आणि तशी मागणी केली पाहिजे, असे डॉ. मेघा पानसरे म्हणाल्या.

0 9 MAR 2022 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महिलांच्या यशोगाथा प्रेरणादायी

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के : जागतिक महिला दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात विशेष कार्यक्रम

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

विविध क्षेत्रांत यशस्वी असलेल्या महिलांच्या यशोगाथांमागे असलेला त्यांचा अनेक वर्षांचा संघर्ष आणि कष्ट अखिल समाजासाठी प्रेरणादायी ठरणारा आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. शिवाजी विद्यापीठाचे शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन, बेटी बचाओ अभियान, विद्यार्थी विकास विभाग आणि संग्राम संस्था, सांगली यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनानिमित्त 'महिला उद्योजकांची यशोगाथा आणि स्त्री सबलीकरणापुढील आव्हाने' या विषयावर एकदिवसीय परिसंवाद आणि महिला उद्योजकांचा सत्कार असा संयुक्त समारंभ विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात आयोजित करण्यात आला. याच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते.



कोल्हापूर : जागतिक महिला दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात विविध क्षेत्रांत प्रभावी योगदान देणाऱ्या महिलांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. आर. व्ही. गुरव व सत्कारमूर्ती महिला.

यावेळी प्रभाताई कुलकर्णी, विजयमाला देसाई, सुचेता कोरगावकर, शैलजा सूर्यवंशी, साधना घाटगे, डॉ. रेश्मा पवार, अश्विनी दानीगोंड आणि प्रा. सपना आवाडे यांचा कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. प्रतिभा देसाई, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या मीना शेषू यांच्यासह शिक्षिका, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते. स्वागत, प्रास्ताविक व परिचय डॉ. भारती पाटील यांनी केले. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले.


उद्घाटन सत्रानंतर झालेल्या पहिल्या सत्रात उपस्थित सत्कारमूर्तींसमवेत डॉ. राजश्री बारवेकर, डॉ. नीलांबरी जगताप आणि अमृता मांजरेकर यांनी संवाद साधला. दुसऱ्या सत्रात 'स्त्री सबलीकरणापुढील आव्हाने' या विषयावर खुली चर्चा झाली. या चर्चेत डॉ. भारती पाटील, मीना शेषू आणि डॉ. मेघा पानसरे यांनी सहभाग घेतला.

जनसंपर्क कक्ष
0 9 MAR 2022 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'प्रत्येक यशस्वी महिलेचा प्रवास प्रेरणादायी'

प्रतिनिधी
कोल्हापूर

महिलांना यश हे काही एका दिवसात मिळालेले नाही. येथील प्रत्येक महिलेने त्यासाठी मोठा संघर्ष केलेला आहे. त्यांचा हा प्रवास प्रेरणादायी आहे. त्यामुळे विविध क्षेत्रांत यशस्वी असलेल्या महिलांच्या यशोगाथांमागे असलेला त्यांचा अनेक वर्षांचा संघर्ष आणि कष्ट अखिल समाजासाठी प्रेरणादायी ठरणारा आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.



कोल्हापूर : महिलांच्या सत्कारप्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत अश्विनी दानीगोंड, डॉ. रेश्मा पवार, विजयमाला देसाई, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, सपना आवाडे आणि डॉ. आर. व्ही. गुरव.

शिवाजी विद्यापीठाचे श्रीमती शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन, बेटी बचाओ अभियान, विद्यार्थी विकास विभाग आणि संग्राम संस्था, सांगली यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनानिमित्त 'महिला उद्योजकांची यशोगाथा आणि स्त्री सबलीकरणापुढील आव्हाने" या विषयावर एकदिवसीय परिसंवाद आणि महिला उद्योजकांचा सत्कार कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते.

चर्चासत्रात डॉ. राजश्री बारवेकर, डॉ. नीलांबरी जगताप, अमृता मांजरेकर यांनी संवाद साधला. डॉ. भारती पाटील, मीना शेषू आणि डॉ. मेघा पानसरे यांनी सहभाग घेतला. स्वागत, प्रास्ताविक व परिचय डॉ. भारती पाटील यांनी करून दिला. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. प्रभाताई कुलकर्णी, विजयमाला देसाई, सुचेता कोरगावकर, शैलजा सूर्यवंशी, साधना घाटगे, डॉ. रेश्मा पवार, अश्विनी दानीगोंड, डॉ. सपना आवाडे यांचा सत्कार कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते केला. यावेळी डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. प्रतिभा देसाई, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या मीना शेषू आदी उपस्थित होते.

0 9 MAR 2022

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संशोधनात महिलांचे पुढचे पाऊल

- जागतिक क्रमवारीत महिलांनी कोरले सुवर्णाक्षरांनी आपले नाव
- पुरुषांचे तुलनेत कमी असल्याचा तज्ज्ञांचा दावा

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

उच्च शिक्षणातील बहुविध शाखांमध्ये शिक्षण घेत करिअर करणाऱ्या महिलांचे प्रमाण गेल्या पाच दशकांच्या तुलनेत वाढले आहे. वैद्यकीय, अभियांत्रिकी, व्यवसाय अथवा इतर शाखांमध्ये महिलांचे प्रमाण पुरूषांच्याबरोबरीने वाढताना दिसते. मात्र आंतरराष्ट्रीय स्तरावरील संशोधनाचा विचार करता शिक्षण व गुणवत्ता असूनही घर संसार व इतर जबाबदाऱ्यांमुळे पुरूषांच्या तुलनेत महिलांचे प्रमाण कमी असल्याचे तज्ज्ञांच्या अभ्यासाअंती पुढे येत आहे. महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर महिला संशोधकांचा तरूण भारतने घेतलेला आढावा.

दहावी, बारावी ते पदव्युत्तर शिक्षणात महिला अव्वल आहेत. शिवाजी विद्यापीठात अलीकडे संशोधकांची संख्या वाढत आहे. जागतिक संशोधनाच्या क्रमवारीत टॉप टू पर्सेंटेजमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या तब्बल ४८ संशोधकांनी सुवर्णाक्षरांनी आपले नाव कोरले आहे. यामध्ये जीव रसायनशास्त्र व जैव तंत्रज्ञान अधिविभागाच्या डॉ. ज्योती जाधव यांचा समावेश आहे. 'कंपवात आणि स्मृतीभ्रंश" हा त्यांच्या संशोधनाचा विषय आहे. विद्यापीठातील ३८ अधिविभागात प्राध्यापकांपासून ते अधिविभागप्रमुख, अधिष्ठाता पदापर्यंत महिलांनी मजल मारली आहे.

### अधिविभागवार पीएच. डी. संशोधक महिला

जीव व जैव रसायनशास्त्र : १०
सूक्ष्मजीवशास्त्र : ५, रसायनशास्त्र : १६,
भौतिशास्त्र : २० , वनस्पतीशास्त्र : ३५,
प्राणीशास्त्र : १३, पर्यावरणशास्त्र : ६

अलीकडे विज्ञानात पीएच. डी. करणाऱ्या महिलांचा टक्काही वाढत आहे. पुढे जावून संशोधनातही अनेक महिलांनी आपले खाते खोलले आहे. परंतू पुरूषांच्या तुलनेत हा टक्का कमी असल्याचा दावा तज्ज्ञांनी केला आहे. कारण लग्नानंतर संसार आणि करिअरची जबाबदारी एकाचवेळी सांभाळत तारेवरची करसरत करीत संशोधन करावे लागते. परंतू पुढील संशोधनासाठी परदेशात जावूने संशोधन करण्यास महिलांना मर्यादा येत आहेत. परिणामी महिलांचा टक्का विद्यापीठ नव्हे तर भारतासह जागतिक पातळीवरही कमी असल्याचे तज्ज्ञांनी म्हंटले आहे.

विद्यापीठात गेल्या पाच दशकापासून शिक्षण घेणाऱ्या महिलांची संख्या पुरूषांच्या तुलनेत जास्त आहे. गुणवत्तेच्या जोरावर राष्ट्रपती सुवर्णपदक व कुलपती सुवर्णपदाकाचा बहुमानही महिलाच मिळवत आहेत. उच्च शिक्षणानंतर अध्यापन, उद्योग व्यवसाय, डॉक्टर, अभियांत्रिकी, संगणक प्रोग्रामिंग-डिझायनिंग, बँकिंग, आदी क्षेत्रात पुरूषांच्या बरोबरीन महिला कार्यरत आहेत. शिक्षणातील विविध आव्हाने सक्षमपणे पेलत पीएच. डी., संशोधन प्रकल्पही स्वतंत्रपणे करण्यात महिला अव्वल आहेत. त्यानंतर मिळणाऱ्या फेलोशिपसाठी महिला पात्र असतात. परंतू संसार, करिअर सांभाळत फेलोशिप घेवून परदेशात जावून संशोधक करण्यास त्यांना मर्यादा येत आहेत. त्यामुळेच भारतासह जगभरात महिला संशोधकांचा टक्का पुरूषांच्या तुलनेत कमी आहे. महिलांना कुटुंब व समाजाने संशोधनासाठी प्रोत्साहन देणे, याच खऱ्या अर्थाने महिला दिनाच्या शुभेच्छा ठरतील, असा सूर महिला संशोधकांचा आहे.



### संशोधनासाठी मिळणाऱ्या फेलोशिप

-सिंगल गर्ल्स चाईल्ड फेलोशिप, डी. एस. टी. एन्स्पायर, सारथी फेलोशिप , टाटा इनोव्हेशन फेलोशिप, किशोर वैज्ञानिक प्रोत्साहान योजना, लेडी टाटा मेमोरियल रिसर्च फेलोशिप, राजव गांधी नॅशनल फेलोशिप, पोस्ट डॉक्टरल फेलोशिप, मेरी क्युरी पोस्ट डॉक्टरल फेलोशिप, डीएसटी यंग व्युमन सान्टीस्ट फेलोशिप, डॉ. डी. एस. कोठारी पोस्ट डॉक्टरल फिलोशिप



### महिलांनी करिअरबरोबर संशोधन करावे

मुलींनी करिअर आणि वैयक्तिक जीवनाचा समतोल राखून विविध फेलोशिपच्या संधीचा फायदा घेतला पाहिजे. काही तास नोकरी करण्यात समाधान मानण्यापेक्षा उद्भवणाऱ्या परिस्थितीवर मात करून, मिळालेल्या ज्ञानाचा वापर विज्ञान संशोधन क्षेत्रात करावा. नोकरीबरोबरच संशोधनाकडे महिलांनी लक्ष दिले तर संशोधन क्षेत्राचा ताबाही महिलाच घेतील.

**डॉ. ज्योती जाधव (अधिविभागप्रमुख, जीव रसायनशास्त्र व जैव तंत्रज्ञान अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ)**

0 9 MAR 2022 लोकसत्ता

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महाविद्यालये लवकरच बहुविद्याशाखीय स्वायत्त संस्था

## 'यूजीसी'कडून देशभरातील संस्थांना सूचना

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** देशातील महाविद्यालयांचे २०३५ पर्यंत पदवी देणाऱ्या बहुविद्याशाखीय स्वायत्त संस्थांमध्ये रूपांतर करण्यात येणार आहे. त्यासाठीच्या मार्गदर्शक सूचना विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) जाहीर केल्या असून, या अंतर्गत दुहेरी पदवी, शासकीय आणि खासगी महाविद्यालयांचा समूह, महाविद्यालयांचे विलीनीकरण, बहुविद्याशाखीय संशोधन आदी महत्त्वपूर्ण तरतुदी करण्यात आल्या आहेत.

नवीन शैक्षणिक धोरण २०२० मध्ये बहुशाखीय शिक्षण, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर या धोरणात भर देण्यात आला आहे. तसेच उच्च शिक्षण देणारी महाविद्यालये किंवा विद्यापीठे म्हणजे काय हेही स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे वेगवेगळ्या विद्याशाखांच्या शिक्षणाची, लवचिक अभ्यासक्रमाची सुविधा असलेल्या उच्च शिक्षण संस्था निर्माण करणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर विद्यापीठ अनुदान आयोगाने महाविद्यालयांचे बहुविद्याशाखीय स्वायत्त संस्थांमध्ये रुपांतर करण्यासाठीच्या मार्गदर्शक सूचना तयार करून त्याचा मसुदा संकेतस्थळावर जाहीर केला आहे. या मसुद्यावर २० मार्चपर्यंत हरकती सूचना मागवण्यात आल्या आहेत.

सध्याच्या पद्धतीनुसार विद्यापीठाकडून पदवी दिली जाते आणि महाविद्यालये विद्यापीठाशी संलग्न असतात. विद्यापीठाशी संलग्न असलेली स्वायत्त महाविद्यालये पदवी प्रदान करू शकतात. मात्र प्रस्तावित मार्गदर्शक सूचनांमध्ये जवळच्या महाविद्यालयांनी एकत्र येऊन समूह संस्था केल्यास ती विद्यापीठाचा घटक होऊ शकेल किंवा स्वायत्त संस्था होऊ शकेल. समूह संस्थेला बहुविद्याशाखीय शिक्षणासाठीचे नवीन विभाग सुरू करता येतील, अभ्यासक्रम निर्मिती, परीक्षा पद्धती, पदवी देता येईल. यूजीसीच्या नियोजनानुसार ही व्यावसायिक आणि पारंपरिक विद्याशाखांचा समावेश असलेली एकात्मिक उच्च शिक्षण प्रणाली आहे. नव्या शैक्षणिक धोरणात नमूद केल्याप्रमाणे २०३० पर्यंत प्रत्येक जिल्ह्यात मोठी बहुविद्याशाखीय उच्च शिक्षण संस्था निर्माण करण्याचे उद्दिष्ट असल्याचे मार्गदर्शक सूचनांमध्ये नमूद करण्यात आले आहे.

### विद्यापीठाचे प्रकार आणि दुहेरी पदवी

बहुविद्याशाखीय शिक्षणासाठी यूजीसीने संशोधन केंद्री (आरयू), अध्यापन केंद्री (टीयू) आणि पदवी देऊ शकणारी स्वायत्त उच्च शिक्षण संस्था असे प्रकार निर्माण केले आहेत. त्यातील संशोधन केंद्री आणि अध्यापन केंद्री ही मोठी विद्यापीठे असतील. नव्या मार्गदर्शक सुचनांनुसार विद्यार्थ्यांना एकाच वेळी दोन वेगळ्या विद्यापीठांची पदवीची (दुहेरी पदवी) मुभाही मिळणार आहे. त्यासाठी उच्च शिक्षण संस्थांमध्ये सामंजस्य करार आवश्यक असेल. तसेच मुक्त आणि दूरस्थ अभ्यासक्रमही राबवता येतील.

### समूह महाविद्यालये आणि विलीनीकरण

नव्या मार्गदर्शक सूचनांमध्ये कमी प्रवेश होणाऱ्या महाविद्यालयांचे विलीनीकरण आणि समूह महाविद्यालयाची तरतूद करण्यात आली आहे. या द्वारे शैक्षणिक स्रोत सुधारणे आणि संस्थांचे नॅक मूल्यांकन उंचावणे शक्य होईल. यात खासगी महाविद्यालये विलीनीकरण आणि शासकीय महाविद्यालयांचे विलीनीकरण असे स्वतंत्र प्रकार आहेत. या समूह महाविद्यालयांचे प्रशासकीय कामकाज सुरळीत राहण्यासाठी संचालक मंडळ, विद्या परिषद, वित्त समितीची तरतूद आहे. या संपूर्ण प्रक्रियेमध्ये विद्यापीठ आणि शासनाची जबाबदारी महत्त्वाची ठरणार असल्याचे नमूद करण्यात आले आहे.



### संशोधनाला चालना...

उच्च शिक्षण संस्थांमध्ये बहुविद्याशाखीय संशोधनाला चालना देण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी संशोधनासाठी पूरक वातावरण निर्मिती करणे महत्त्वाचे आहे. जेणेकरून विद्यार्थी आणि प्राध्यापकांना संशोधन करून ते संशोधन पत्रिकांमध्ये प्रसिद्ध करणे, एकस्व अधिकार नोंदणी, शोधनिबंध लिहिता येतील. बहुविद्याशाखीय संशोधनासाठी उच्च शिक्षण संस्थांनी उद्योगांशी जोडले जाऊन विद्यार्थ्यांना कार्यानुभव देता येईल. उच्च शिक्षण संस्था एकत्र येऊन त्यांच्याकडील प्राध्यापक पदवीपूर्व आणि पदव्युत्तर पदवी स्तरावरील विद्यार्थ्यांना संशोधनासाठी मार्गदर्शन करू शकतील.

पुढारी

# स्पर्धा परीक्षार्थींनी क्रमिक पुस्तकांचे आकलन करावे

## जॉर्ज क्रूझ यांचे प्रतिपादन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**



स्पर्धा परीक्षार्थींनी अभ्यास करीत असताना शालेय क्रमिक पुस्तकांचे आकलन .योग्य पद्धतीने करवून घेणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक जॉर्ज क्रूझ यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रातर्फे आयोजित 'मी पीएसआय, एसटीआय, असिस्टंट होणार' या कार्यशाळेत मार्गदर्शन करताना ते बोलत होते. क्रूझ यांनी विद्यार्थ्यांनी करिअरचा 'प्लॅन बी' तयार असण्याचे महत्त्व स्पर्धा परीक्षार्थींना सांगितले.

दुसऱ्या सत्रात डॉ. अनिल सत्रे यांनी भारतीय अर्थव्यवस्था, उत्पन्न, शेती, उद्योग, परकीय चलन, बँकिंग, लोकसंख्या, दारिद्र्य, बेरोजगारी, लेखा परीक्षण, राजकोषीय निती, शासकीय अर्थव्यवस्था आदी घटकांची माहिती दिली. अंतिम सत्रात डॉ. पी.एस. कांबळे यांनी केंद्रीय अंदाजपत्रक, राज्याचे अंदाजपत्रक, आर्थिक पाहणी अहवाल यांचे विश्लेषण व महत्त्व याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

जनसंपर्क कक्ष
0 9 MAR 2022 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात शुक्रवारी अधिसभा

## विविध विषयावर चर्चा: जास्त प्रश्नांना न्याय मिळावा अशी भूमिका

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाची अधिसभा ११ मार्च रोजी होणार आहे. सर्वच अधिकार मंडळाची ही अखेरची पंचवार्षिक अधिसभा असणार आहे. त्यामुळे प्रत्येकाने आपआपल्या भागातील महाविद्यालय, शिक्षक, विद्यार्थी आणि संशोधनासंदर्भातील ठराव मांडले आहेत. यामध्ये संशोधन वाढीसाठी समर रिसर्च फेलोशिप मिळावी, सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त मंजूर पदांना राज्य शासनाची रितसर मंजुरी मिळावी. अशा अनेक ठरावांसह विद्यापीठातील कुलसचिवपद किती दिवसापासून रिक्त आहे, ते भरण्यासाठी विद्यापीठ प्रशासन काय प्रयत्न करणार आहे, अशा अनेक विषयावर अधिसभेत चर्चा होणार आहे. या ठरावांवर चर्चा होऊन यातील किती मंजूर व किती नामंजूर होणार याकडे शिक्षण वर्तुळाचे लक्ष लागले आहे. सदस्यांनी गोंधळ न करता कामकाज केले तर जास्त प्रश्नांना न्याय मिळेल अशी चर्चा आहे.

तरुण भारत

# ‘स्पर्धा परीक्षार्थींनी क्रमिक पुस्तकांचा अभ्यास करावा’

कोल्हापूर : स्पर्धा परीक्षार्थींनी अभ्यास करताना शालेय क्रमिक पुस्तकांचे आकलन करून घेणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक जॉर्ज क्रूझ यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या स्पर्धा परीक्षा केंद्राच्या कार्यशाळेत ते बोलत होते. ‘मी पीएसआय, एसटीआय, असिस्टंट होणार’ हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता.